## पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## स्थानिक संस्था कर विभाग

---

### सन 2014-15 या आर्थिक वर्षाचे LBT विषयक वार्षिक विवरणपत्र (E-II) बाबत
# जाहिर सूचना

शहरातील सर्व व्यापारी / व्यावसायिक यांना कळविणेत येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्थानिक संस्था कर लागू आहे. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, 2010 मधील नियम 40 मधील तरतूदीनुसार स्थानिक संस्था कराची रक्कम पुढील महिन्याच्या 20 तारखेला किंवा त्यापूर्वी भरणा करणे आवश्यक आहे. तसेच, नियम 29 मधील तरतुदीनुसार 31 मार्च 2015 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षानंतर 90 दिवसाचे आत नोंदणीकृत व्यापारी/व्यावसायिक यांनी वार्षिक विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सन 2014-15 हे आर्थिक वर्ष 31 मार्च 2015 रोजी संपत आहे. नोंदणीकृत सर्व व्यापारी/ व्यावसायिक यांना कळविणेत येते की, सन 2014-15 करिताचे वार्षिक विवरणपत्र (E-II) दाखल करणेची अंतिम मुदत 29 जून 2015 असलेने या मुदतीचे आत विवरणपत्र दाखल करणेची दक्षता घ्यावी. महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईट वरुन online पध्दतीने विवरणपत्र दाखल करणेची सुविधा उपलब्ध आहे. सदर मुदतीत विवरणपत्र दाखल न केल्यास स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 33(7) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 152ल मधील तरतूदीनुसार कारवाई होईल याची कृपया नोंद घ्यावी.

तरी सर्व नोंदणीकृत व्यापारी यांनी विवरणपत्र मुदतीत दाखल करावे व महानगरपालिकेमार्फत होणारी कठोर कारवाई टाळावी.

20/3/15

सहाय्यक आयुक्त
**स्थानिक संस्था कर विभाग**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - 411018

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ★ पिंपरी-४११ ०१८ ★ स्थापना ११-१०-१९८२

जा. क्र.- स्थासंक/6/कावि/72/2015
दिनांक - 20/03/2015